**शासकीय, अनुदानित व शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - इमाव-२००७/ प्र.क्र. १५०/मावक-३
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ जुलै, २००८.

**वाचा :**
१) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक - एसएसएन-२१०३/ (५०/०३)/माशि-२, दिनांक २७.५.२००३
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक - युएसजी-२००३/ (८५/०३)/विशि-४, दिनांक २४.९.२००३
३) शासन निर्णय,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग क्रमांक - एमईडी-१००३/ सीआर ५०४/भाग ३/२००३/शिक्षण-२, दिनांक २५.११.०३
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक - टीइएम-२००३/ (२४९/०३)/तांशि-१, दिनांक १२.५.२००४
५) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:इमाव-२००३/प्र.क्र. २०३/मावक-३, दि. ०६/१०/२००३
६) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:इमाव-२००२/प्र.क्र. ४१४/मावक-३, दि. १२/०३/२००७
७) शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:इमाव-२००२/प्र.क्र. ४१४/मावक-३, दि. २६/०४/२००७
८) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:विजाक-२००५/प्र.क्र. ४५/मावक-३, दि. १७/०१/२००८.
९) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:इमाव-२००७/प्र.क्र. १५०/मावक-३, दि. २६/०३/२००८.

**प्रस्तावना-** शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २००६-०७ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ९ फेब्रुवारी २००७ अन्वये घेतला. तसेच सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासन निर्णय दिनांक २६ मार्च, २००८ अन्वये सदर योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजना सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात पूढे चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -** राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (बी.एड. व डी.एड.कोर्स वगळून) सन २००८-०९ या वर्षी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची १००% प्रतिपूर्ती करण्यास तसेच इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्काच्या ५०% दराने प्रतिपूर्ती करण्यास खालील अटींवर शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजना सन २००६-२००७ व सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षात खालील व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीपर्यंत व सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या वर्षापुरती लागू राहील.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माण शास्त्र | औषधनिर्माण शास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | आर्कीटेक्चर | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान)

ड) इ.१० वी ची शालांत परिक्षा (S.S.C./C.B.S.E. व तत्सम) उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या पूर्णवेळ अभ्यासक्रमात (Full Time Course) शिकणा-या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदर योजना अनुज्ञेय राहील.

३. या योजनेचा लाभ विनाअनुदानित तसेच कायम विनाअनुदानित महाविद्यालयात खाली नमूद केलेल्या अभ्यासक्रमांसाठी खालीलप्रमाणे लागू राहील.

अ) **अभियांत्रिकी अभ्यासक्रम** - शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (CET) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहिल. (सदर योजनेचा लाभ संस्थास्तरावर करण्यात येत असलेल्या (Institutional level quota) परिक्षेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही)

ब) **आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम** - शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (CET) प्रवेश घेतलेल्या तसेच खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांच्या वतीने तसेच असोसिएशन मार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (Associate CET) आणि इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांसाठी (उदा.नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील. एकूण प्रवेश क्षमतेच्या १५ % जागा अनिवासी भारतीयांकरीता राखून ठेवल्या जातात. सदर व्यवस्थापन कोट्यामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांस तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय राहणार नाही.

क) **कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय अभ्यासक्रम** - काही अभ्यासक्रमांसाठी शासनाची सामायिक परिक्षा (CET) घेण्यात येत नाही. त्यावेळी इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारावर अशा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

४. आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय जातीच्या विद्यार्थ्यांसाठीसुद्धा सदरची योजना लागू राहील.

५. सदर योजनेचा लाभ घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना जातीच्या वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता राहील.

६. ही योजना अनिवासी भारतीयांकरीता (NRI) कोट्यातून व्यवस्थापनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रवेशार्थीस व अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या

विद्यार्थ्यांना लागू रहाणार नाही. परंतु एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या [Allowed To Keep Terms (A.T.K.T.) मिळालेल्या] विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

७. यासाठी होणारा खर्च विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयासाठी असलेल्या शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क प्रदाने या योजनेसाठी असलेल्या प्रधान शिर्षाखाली सन २००८-०९ या आर्थिक वर्षात दिलेल्या अर्थसंकल्पीय तरतूद, पुरवणी मागणी आणि सुधारीत अंदाजातून उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २००८०७१८०९४०३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( एन.आरुमुगम )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री कृषी व पदुम यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, (विमुक्त जाती, भटक्या जमाती यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहाय्यक.
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, महाराष्ट्र राज्य, पुणे (पाच प्रती )
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/ अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
नियोजन विभाग, (१४३१/१४११), मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, (व्यय १४/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-५), मंत्रालय, मुंबई
सहसंचालक, लेखा व कोशागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (दोन प्रती )
सामाजिक न्याय विभागातील सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
निवड नस्ती, मावक ३